प्रेसनोट दि. २७.०६.२०२३

लोकसेवक श्री. विजय आनंदराव पवार, वय ५० वर्ष, व्यवसाय – फायरमन प्रभारी मुख्य अग्निशमन अधिकारी सांगली,मिरज कुपवाड शहर महानगरपालिका सांगली यांना १,२५,०००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांच्या कंपनी मार्फत फायरफायटिंग सिस्टीम बसविल्याचा कामाचा अंतिम दाखला दिल्याचा मोबदला म्हणुन १,५०,०००/- रु मागणी लोकसेवक विजय पवार यांनी केली होती. तक्रारदार यांनी १,५०,०००/- रु नाही दिले तर तक्रारदार यांचे कंपनी मार्फत करण्यात येणा-या पुढील फायर फायटिंग सिस्टीमचे अंतिम दाखल्याची कामे करणार नाही असे लोकसेवक विजय पवार यांनी तक्रारदार यांना सांगितलेने तक्रारदार यांनी त्यांचेकडे १,५०,०००/- रूपये लाच मागणी केली असल्या बाबतचा तक्रारी अर्ज दि.१५.०६.२०२३ रोजी अँन्टी करप्शन ब्युरो सांगली पथकास दिला होता.

तकारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक १५.०६.२०२३ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये लोकसेवक विजय आनंदराव पवार यांनी तक्रारदार फायर फार्यटिंग सिस्टीम बसविल्याचा कामाचा अंतिम दाखला दिल्याच्या मोबदला म्हणुन १,५०,०००/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती १,२५,०००/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर दि. २७.०६.२०२३ रोजी अग्नीशमन व आणीबाणी सेवा विभाग, गुरुव्दार जवळ टिंबर ऐरिया सांगली या कार्यालय मध्ये सापळा लावला असता लोकसेवक विजय आनंदराव पवार यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून १,२५,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने लोकसेवक श्री. विजय आनंदराव पवार, वय ५० वर्ष, व्यवसाय – (फायरमन) प्रभारी मुख्य अग्निशमन अधिकारी सांगली,मिरज कुपवाड शहर महानगरपालिका सांगली वर्ग-३ रा.जोशी प्लॉट संभाजीनगर, त्रिमुर्ती कॉलनी सांगली. यांचेविरुध्द विश्रामबाग पोलीस स्टेशन येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. अमोल तांबे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्रीमती शितल जानवे सो, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संदीप पाटील, पोलीस उप अधीक्षक, श्री.विनायक भिलारे, श्री. दत्तात्रय पुजारी पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार अजित पाटील, सलिम मकानदार, प्रितम चौगुले, ऋषीकेश बडणीकर, धनंजय खाडे, सुदर्शन पाटील, उमेश जाधव, अतुल मोरे, रविंद्र धुमाळ, सिमा माने, चालक वंटमुरे यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स अॅप नंबर व मोबाईल नंबर ९८२१८८०७३७ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल अॅप - www.acbmaharashtra.net
२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB
३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

Scanned with OKEN Scanner